Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 101 – 104

DOI: 10.5281/zenodo.10072682

**Original Research Article**

# ग्रामीण विकासाच्या संदर्भात महात्मा गांधी यांचे विचार

प्रा. डॉ. डी. पी. कांबळे

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी, ता. औसा जि. लातूर ४१३५१६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: dkamble407@gmail.com

Received: 11 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

**प्रस्तावना**

भारत हा जगात सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. भारत हा खेड्यांचा देश आहे व तो प्राचीन काळापासून खेड्यातच वसलेला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भारतात 70 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्य करते; खेड्याकडे चला हा संदेश महात्मा गांधीजींनी लोकांना दिला भारत हा खेड्यात आहे असे म्हणणारे देखील महात्मा गांधीच होते. त्यांनी ग्रामीण विकासासंदर्भात आपले विचार लोकांना पटवून देण्याचे कार्य केले. ग्राम सक्षम बनले पाहिजे आणि स्वयंपूर्ण ग्राम हेच सक्षम व शक्तिशाली भारताचे भविष्य आहे म्हणूनच महात्मा गांधींनी ग्रामविकास व ग्रामस्वराज्याचे समर्थन करून त्यासाठी रचनात्मक चळवळ उभी करून ग्रामीण जीवनाचे चित्र पालटण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधी मेरे सपनो का भारत या पुस्तकात म्हणतात की भारत हा सात लाख खेडे मिळून बनलेला देश आहे. भारत हा शहरांचा देश नाही तर तो खेड्यांचा देश आहे म्हणूनच ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होऊ शकत नाही. म्हणजेच प्राचीन काळापासून खेड्यांना प्रशासनात व देशाच्या जडणघडणीत मुख्य स्थान होते म्हणून महात्मा गांधीजींनी देशांच्या सर्वांगीण विकासाकरिता ग्रामीण भागाचा विकास करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 70 वर्षे होऊन ही गावांचा पूर्णपणे विकास झालेला नाही. अनिष्ट रूढी परंपरा चालीरीती संस्कृती अविकसित असल्यामुळे गावांचा विकास खुंटला. गावातील सत्ता मोजक्या लोकांच्या हाती आल्याने योग्य व्यक्तींच्या सुप्त गुणांना वावमिळत नाही यासाठी खेडी आत्मनिर्भर स्वावलंबी होणे गरजेचे आहे. गांधीजी असे म्हणतात की खेड्यांची सुधारणा व खेडी विकसित करणे हे राष्ट्राचे पहिले कर्तव्य आहे. त्यांचे असे म्हणणे होते की गावात सुधारणा

झाल्या पाहिजेत गावांचे आरोग्य सुदृढ असले पाहिजे व स्वावलंबी असले पाहिजे. म्हणजे संपूर्ण देश त्याच पद्धतीने उभा होईल. महात्मा गांधीजींचे जीवन म्हणजे एक तत्त्वज्ञानच होते या तत्त्वज्ञानावर नैतिकतेच्या आदर्शवादाचा पगडा होता. गांधीजी हे काळाच्या फार पुढे होते उद्योगधंद्यांचे एकाच ठिकाणी केंद्रीकरण न करता उद्योगांचे विकेंद्रीकरण त्यांना अपेक्षित होते. त्यासाठी त्यांनी ग्रामीण औद्योगीकरणाची संकल्पना मांडली. खेड्यातील लोकांना खेड्यातच रोजगाराची संधी निर्माण करून खेडी हेच विकासाचे केंद्र म्हणून पुढे आले पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**

१. गांधीजींची ग्रामीण विकासाची संकल्पना समजावून घेणे.
२. गांधीजींच्या विचारातील स्वयंपूर्ण खेडी खेडी अभ्यासणे.
३. ग्राम विकासासाठी नव तरुणांना पुढे येण्याचे आवाहन करण्याचा उद्देश अभ्यासणे.
४. सत्य अहिंसा व सत्याग्रहाचे महत्त्व जगाला पटवून देणे.
५. महात्मा गांधीजींच्या विचाराची उपयुक्तता स्पष्ट करणे .
६. विकास कार्यातील जनतेचा सहभाग वाढविणे.

**महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासासंबंधी विचार**

**१. ग्रामस्वराज्य**

ग्रामस्वराज्य म्हणजे प्रत्येक खेडे एक स्वतंत्र स्वायत्त लोकराज्य असले पाहिजे. प्रत्येक गावाचे व्यवस्थापन सरकारी तत्त्वानुसार चालविले गेले पाहिजे. गावात कायदा व्यवस्था न्यायव्यवस्था व कार्यकारी मंडळ असावे, म्हणजेच प्रत्येक गावात पूर्ण लोकशाही असावी.

**२. ग्रामीण अर्थव्यवस्था**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषीप्रधान देशात शेतीला प्राधान्यक्रम देऊन शेतीच्या उत्पादित कच्च्या मालावर विविध प्रकारचे उद्योग निर्माण केले पाहिजेत. कच्च्या मालास उत्पन्न क्षेत्रात उद्योगास परवानगी द्यावी जेणेकरून बेकारीचा प्रश्न सुटेल व श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. म्हणजेच रोजगाराची हमी देणारी अर्थव्यवस्था महात्मा गांधीजींना मान्य होती.

**३. ग्रामीण उद्योगांना चालना**

महात्मा गांधीजींनी मोठ्या उद्योगाला विरोध दर्शवलेला असून, लहान उद्योगांचा त्यांनी पुरस्कार केला आहे. कारण घरगुती उद्योगधंद्यातील यंत्रसामग्री लहान व साधी असते, तसेच ती कमीत कमी खर्चाची असते त्यामुळे अशी उद्योगधंदे घरोघरी चालविले जाऊ शकतात. यामुळे उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण होण्यास मदत होते.

**४. सर्वोदयाची संकल्पना**

सर्वोदयाची संकल्पना महात्मा गांधीजींनी समतावाद व साम्यवादाला धरून मांडलेली आहे. कारण सर्वोदयामध्ये नैतिकतेवर विशेष भर देण्यात आला आहे. या संकल्पनेत राष्ट्र हे व्यक्तीच्या विकासाचे साधन आहे यामध्ये शोषण विरहित

वर्ग विरहित समाज रचना यावर भर दिलेला आहे, यातून समाजाचा सर्वांगीण विकास होऊन देशाचा विकास अपेक्षित आहे. आजच्या परिस्थितीत सर्वोदयातील अपेक्षेनुसार मानवी विकास हे साध्य तर देशाचा आर्थिक विकास हे साधन बनलेले आहे.

**५. ग्रामोद्योग संघाची स्थापना**

1934 मध्ये कॉंग्रेसच्या इतर काही नेत्यांमध्ये व महात्मा गांधी मध्ये मतभेद निर्माण झाले. त्यानंतर महात्मा गांधीजींनी तीन वर्षे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अध्ययनामध्ये व ग्रामीण विकासाच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले. ऑक्टोबर 1934 च्या मुंबई येथील कॉंग्रेस अधिवेशनात महात्मा गांधीजींच्या राजीनाम्याला मंजुरी देण्यात आली. त्यातच अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या स्थापनेचा प्रस्ताव पास केला गेला व भारतात ग्राम उद्योग संघाची स्थापना केली गेली. ग्राम उद्योग संघाचे मुख्य कार्यालय मगनवाडी जिल्हा वर्धा येथे होते ग्राम उद्योग संघाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश ग्रामीण उद्योगांची सुरक्षा तसेच उद्योगांची प्रगती करणे ग्रामीण भागातील जनतेचा आर्थिक व नैतिक विकास घडवून आणणे.

**६. कुटीर उद्योगांचे पुनर्जीवन व ग्राम विकास**

खेड्यातील प्रत्येक कुटुंबाचा विकास कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा विकास म्हणजे ग्रामविकास पर्यायाने देशाचा विकास होय. ग्रामीण विकास ही देशांच्या विकासाची संजीवनी आहे सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेली माणसे गावात उभी करणे हा खरा देशाचा विकास आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे व्यापार उद्योग वाढीस लागला परंतु नवीन कारखाने आणि औद्योगिक प्रगतीमुळे भारतासारख्या विकसनशील देशात त्याचा परिणाम झालेला आहे. महात्मा गांधीजी म्हणतात की विज्ञान-तंत्रज्ञानाला माझा विरोध नाही, परंतु भारतासारख्या विशाल देशात लोकसंख्या जास्त असल्यामुळे कारखानदारीचा परिणाम वाईट झाला. भारतात परंपरागत असलेल्या कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाला, बेकारी वाढली शहरीकरणाला वेग आला आणि संपूर्ण खेडी ओस पडून परावलंबी झाली. महात्मा गांधीजी यंत्राच्या विरोधी नव्हते कारण चरखा सुद्धा एक यंत्रच आहे पण हे यंत्र मानवाला लाभ मिळवून देणारे आहेत ते यंत्र मानवाला नुकसान पोहोचविणारे नाहीत म्हणून अशा लाभदायी यंत्राचा महात्मा गांधी स्वागत करतात. त्याचबरोबर खेड्यामधून उत्पादित होणाऱ्या वस्तू भारतातील लोकांनी जर स्वदेशी वस्तू म्हणून वापरल्या तर ग्रामीण भागातील लघुउद्योग व कुटीर उद्योग भरभराटीला येतील त्यामुळे ग्रामीण भागाचा पर्यायाने देशाचा निश्चितच विकास होईल.

**सारांश**

महात्मा गांधीजी मानवी जीवनाच्या विविध पैलूंचा सूक्ष्म पद्धतीने आध्यात्मिक व सांस्कृतिक पातळीवर विचार करणारे एक महान व्यक्ती होते. देशातील खेडी स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास होणार नाही म्हणून खेड्याकडे चला असे म्हणत साधी राहणे व उच्च विचार आणि खादीचा वापर हे स्वतःसह आपल्या समस्त कार्यकर्त्यांनाही आग्रहाने सांगत. ग्रामीण विकाससंबंधी त्यांनी सत्य, अहिंसा, जातीय धार्मिक समानतेसंबंधीची कामे केली, परंतु त्यांचे कार्य भारतातील अध्यात्मिक व संस्कृती जतन करण्याकरिता होती हे आपण समजून घेतले पाहिजे. पूर्वी सारखी खेडी निर्माण करणे व त्यांचे संघटन करणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने निरनिराळ्या योजनेस व गांधीजींच्या विचारावर आधारित सर्वोदय योजनेअंतर्गत अनेक योजना राबविले आहेत. त्यामध्ये बचत गटांची योजना ही संघटन व लघु

उद्योगांना वाव मिळवून देण्यासाठी सुरू केली आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेला आपल्याच गावामध्ये रोजगार निर्माण करून दिला जात आहे. आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छतेकडे व पोषक आहारासंबंधीचे विविध कार्यक्रम देशात राबविले जात आहेत. यासाठी प्रत्येक गावात आरोग्य केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. अशा या गांधी विचारांनी समृद्ध असलेली खेडी तयार करून समृद्ध भारत निर्माण करणे आवश्यक आहे. आज गांधीजींच्या विचारांना महत्त्व देऊन विविध प्रकारचे प्रयत्न सुरू झालेले आहेत. आपल्या देशामध्ये असलेली गरिबी, दारिद्र्य, बेकारी, अशिक्षित पणा दूर करण्यासाठी केलेले प्रयत्न हे केवळ आणि केवळ गांधी विचारांमधूनच दिसून येत आहेत.

**संदर्भ सूची**


१. डॉ. आर. एम. भिसे. वर्तमान परिस्थितीत महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता. प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. ऑक्टोबर. 2012

२. डॉ. राजेंद्र अत्री. महात्मा गांधी संपूर्ण विचारों का संग्रह. सरला प्रकाशन, शिमला. 01 जानेवारी 2018.

३. पटवर्धन पुरुषोत्तम. अनुवादक सत्याचे प्रयोग आत्मकथन, मोहनदास करमचंद गांधी. जीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद. जानेवारी. 2011

४. श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुल आश्रम. ग्राम जयंती विशेषांक. एप्रिल – मे. 2001.